# जिल्हा न्यायालय भरती प्रक्रिया – २०२३

## मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे अंतिम निर्णयास अधीन राहून

## कनिष्ठ लिपीक या पदाचे मूलाखतीकरीता पात्र ठरलेल्या व बोलविण्यात येणा–या उमेदवारांसाठी सूचना

**मुलाखतीकरीता पात्र उमेदवार यांनी स्वतंत्र प्रकाशीत वेळापत्रकाप्रमाणे नियोजीत दिनांकास खालील मूळ दस्तऐवज व त्याच्या साक्षांकीत प्रतींसह उपस्थित रहावे.**

१) जन्मतारखेचा दाखला किंवा पुरावा (शाळा सोडल्याचा दाखला / जन्म दाखला / माध्यमिक शाळा प्रमाणपत्र)

२) अर्हता परीक्षा / पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.

३) अर्हता परीक्षा / पदवी परीक्षा मध्ये मिळविलेल्या गुणांची गुणपत्रिका.

४) दोन सन्माननीय व्यक्तींनी दिलेली चारित्र्य प्रमाणपत्रे, त्यांचे नांव, पदनाम आणि पूर्ण टपाल पत्यासह जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकास किंवा नंतर दिलेले, उमेदवाराचे नैतिक चारित्र्य चांगले असल्याचे प्रमाणित करणारे, या जाहिराती बरोबर दिलेल्या विहित नमुन्यात दिलेले.

५) पात्रतेच्या निकषात नमूद केल्याप्रमाणे विद्यापीठ / संस्थेने जारी केलेले संगणक संचालनातील विहित ज्ञानाविषयीचे प्रमाणपत्र.

६) पात्रता निकषात नमूद केल्याप्रमाणे शासकीय परीक्षा ब्युरो, महाराष्ट्र राज्य किंवा शासकीय मंडळ, किंवा आय.टी.आय. ने जारी केलेले व इंग्रजी व मराठी टायपिंगमधील आवश्यक गतीचे प्रमाणपत्र.

७) शासनाने विहित केलेल्या प्राधिका–याकडुन निर्गमीत केलेला जातिचा दाखला, जिथे लागू असेल तेथे.

८) उमेदवाराने राज्य / केंद्र सरकारच्या सेवेत असल्यास संबंधित विभागाकडून "ना हरकत प्रमाणपत्र".

९) अनुभव प्रमाणपत्र / प्रमाणपत्रे, असल्यास.

१०) विवाहीत महिला उमेदवारांच्या बाबतीत, जर तिने लग्नानंतर आपले नांव बदलले असेल तर तिचे नांव बदलण्या संदर्भातील कागदपत्रे, जसे की शासकीय राजपत्र / सक्षम प्राधिकरणाने जारी केलेल्या विवाह नोंदणी प्रमाणपत्राची प्रत इत्यादी.

११) अर्ज तारखेस असलेल्या अथवा त्यानंतर प्राप्त केलेल्या किमान पात्रतेपेक्षा अधिक उच्च व तांत्रीक शैक्षणिक पात्रतेची प्रमाणपत्रे व त्यांची गुणपत्रीका.

१२) उपरोक्त सर्व कागदपत्रांची **स्वसाक्षांकीत (Self Attested) एक** प्रत सादर करावी.

**इतर सूचना :–**

१) उमेदवारांनी परीक्षेचे मूळ प्रवेशपत्र सोबत आणणे बंधनकारक आहे.

२) मोबाईल/ स्मार्टवॉच / ब्ल्युटूथ इत्यादी इलेक्ट्रॉनिक उपकरणे मुलाखतीदरम्यान वापरण्यास प्रतिबंध आहे.

**नोट :– कागदपत्रांच्या पडताळणीनंतर सदर उमेदवारांची मुलाखत लगेच सुरु होईल.**

दिनांक :– ११ नोव्हेंबर, २०२४
ठिकाण :– परभणी.

आदेशान्वये

11/11/2024

प्र. प्रबंधक,
जिल्हा न्यायालय, परभणी